पोलीस अधीक्षक , कार्यालय, पालघर.
जिल्हा मुख्यालय, कोळगाव, पालघर
दुरध्वनी – ०२५२५ - २५११००
E-mail: - sp.palghar@mahapolice.gov.in

---

# प्रेसनोट क्र. २१ दिनांक २५/०३/२०२३

# मनोर पोलीस ठाणे येथे दाखल खूनाच्या गुन्हयातील आरोपी यास जन्मठेपेची शिक्षा

यातील मयत नामे सखाराम लक्ष्मण कांटेला वय २७ वर्षे, रा. निहे फरलेपाडा ता. जि. पालघर हा दि.०४/०८/२०१७ रोजी सकाळी ०७.०० वा. कामावर जाण्यास निघाला असता यातील आरोपी शरद देऊ कांटेला वय ३३ वर्षे याने जुन्या झालेल्या भांडणाचा राग मनात धरुन लोखंडी पाईपने डोक्यावर मारहाण करुन गंभीर दुखापत केली. त्यामध्ये सखाराम लक्ष्मण कांटेला हे जागेवरच मयत झाले. सदरवेळी साक्षीदार मयताची आई लक्ष्मी लक्ष्मण कांटेला वय ५५ वर्षे व पत्नी सुचीता सखाराम कांटेला वय २५ वर्षे या मदतीस गेल्या असता त्यांनादेखील आरोपी याने लोखंडी पाईपने मारहाण करुन गंभीर दुखापत केली. यातील मयताची आई लक्ष्मी लक्ष्मण कांटेला यादेखील उपचारादरम्याण मयत झाले म्हणून मनोर पोलीस ठाणे येथे गु.र.नं. I ९८/२०१७ भा.द.वि.स. कलम ३०२,३०७,३५२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे अन्वेषण पोनि/महेश पाटील व सपोनि/अक्षय सोनवणे, तत्कालीन नेमणूक मनोर पोलीस ठाणे यांनी करुन आरोपीविरुध्द कौशल्यपुर्ण सबळ पुरावा गोळा करुन मा. अतिरीक्त सत्र न्यायालय, पालघर येथे दोषारोपपत्र सादर केले होते. सदर खटल्यामध्ये सर्व साक्षीदार यांचे साक्षीवरुन तसेच केलेल्या तपासावरून आरोपीविरुध्द अपराध केल्याचा पुरावा शाबीत झाल्याने **मा. श्री. डॉ. मकरंद देशपांडे, अतिरीक्त सत्र न्यायालय पालघर** यांनी आरोपी यास भा.द.वि.स कलम ३०२ प्रमाणे जन्मठेप, भा.द.वि. कलम ३०७ प्रमाणे जन्मठेप व ९०००/- रुपये रोख दंडाची शिक्षा सुनावली आहे. सदर गुन्हयात सरकारी वकील म्हणून श्री. एस. बी. सावंत, तपासी अंमलदार म्हणुन पोनि/महेश पाटील व सपोनि/अक्षय सोनवणे, तत्कालीन नेमणूक मनोर पोलीस ठाणे व कोर्ट पैरवी म्हणुन सफौ/भरत बी. गावीत यांनी कामकाज पाहिले.